# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र./फॅक्सक्र., ०७१३२-२२३१०४ email:-gug.registrar@gmail.com/registrar@unigug.ac.in


जा.क्र. /गोंविग/कुसका/ ९५४४ /२०२६ दि. २८/०९/२०२६

प्रति,
मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय:** - दिनांक २९ सप्टेंबर, २०२६ रोजी आयोजित महाकुंभ महाराष्ट्र - २०२६ अंतर्गत रोजगार मेळावा स्थगित करण्यात आल्याबाबत.

**संदर्भ :-** जिकौविरोवउमाके-गड/रो.मे./२६-२७/१७७५/२०२६ दि. २४/०९/२०२६ रोजीच्या पत्रान्वये.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणास सूचित करण्यात येते की, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, गडचिरोली यांच्याव्दारे विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता दिनांक २९/०९/२०२६ रोजी महाकुंभ महाराष्ट्र - २०२६ रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले होते.

परंतू भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या औरंगाबाद, पुणे आणि नागपूर पदविधर मतदारसंघ तसेच अमरावती आणि पुणे शिक्षक मतदारसंघाच्या व्दिवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. त्यानुसार दिनांक २३ ऑक्टोंबर, २०२६ रोजी मतदान होणार असून, संबंधित क्षेत्रात आदर्श निवडणूक आचारसंहिता (Model Code of Conduct) तातडीने लागू करण्यात आली आहे. त्यामुळे गडचिरोली जिल्हयाचा समावेश नागपूर पदविधर मतदारसंघात असल्याने, आदर्श आचारसंहितेच्या अनुषंगाने दिनांक २९ सप्टेंबर, २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याला सध्या स्थगिती देण्यात आली आहे.

त्याअनुषंगाने आपल्या अधिनस्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सुचना देण्याबाबत संदर्भीय पत्र प्राप्त झालेले असून सदर संलग्न पत्राचे अवलोकन करुन विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावर कळविण्यात यावे.

धन्यवाद !

(डॉ. अनिल हिरेखण)
कुलसचिव

**प्रतिलिपी :-**

१. मा. कुलगुरूंचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र- कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,

शासकीय संकुल बॅरेक क्रमांक-२ युनिट क्रं-२,कॉम्प्लेक्स,गडचिरोली-४४२६०५

ई-मेल : asstdiremp.gadchiroli@ese.maharashtra.gov.in/gadchirolirojgar@gmail.com

Webside :-http://www.mahaswayam.gov.in Phone:-07132-222368


जाक्रं/जिकौविरोवउमाके-गड/रो.मे./२६-२७/ 1775 /२०२६ दिनांक. २४, सप्टेंबर ,२०२६.

प्रति,

मा.कुलगूरू,

गोंडवानां विद्यापीठ, गडचिरोली,

जि.गडचिरोली.

विषय :- दिनांक. २९ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित "महाकुंभ महाराष्ट्र-२०२६ अंतर्गत रोजगार मेळावा स्थगित करण्यात आल्याबाबत.

संदर्भ :- मा. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय,नवी मुंबई यांचे दिनांक.२४.०९.२०२६ रोजीचे प्राप्त मेल.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सविनय कळविण्यांत येते आहे की, भारताचे पंतप्रधान मा.श्री. नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून, गडचिरोली जिल्हयामध्ये एकाच दिवशी, एकाच वेळी १) शिवाजी महाविद्यालय,गडचिरोली २) महात्मा गांधी कला, विज्ञान महाविद्यालय, आरमोरी, ३) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) वडसा, ४) शहीद बिरसामुंडा महाविद्यालय, कोरची ५) शिवाजी ज्युनिअर कॉलेज ,चामोर्शी, ६) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) आलापल्ली, ७) भगवंतराव आटर्स अॅण्ड सायन्स कॉलेज , एटापल्ली ८) श्री.जीवनराव सिताराम पाटील गुनघाटे आर्टस कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज , धानोरा या आठ ठिकाणी मंगळवार दिनांक. २९ सप्टेंबर २०२६ रोजी "रोजगार महाकुंभ महाराष्ट्र-२०२६" अंतर्गत रोजगार मेळावे / प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यांत आले होते.

परंतू, भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या औरंगाबाद, पुणे आणि नागपूर पदविधर मतदारसंघ तसेच अमरावती आणि पुणे शिक्षक मतदारसंघाच्या व्दिवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. त्यानूसार दिनांक.२३ ऑक्टोंबर २०२६ रोजी मतदान होणार असून, संबंधित क्षेत्रात आदर्श निवडणूक आचारसंहिता ( Model Code of Conduct ) तातडीने लागू करण्यांत आली आहे.

त्यामुळे गडचिरोली जिल्हयाचा समावेश नागपूर पदविधर मतदारसंघात असल्याने, आदर्श आचारसंहितेच्या अनुषंगाने दिनांक.२९ सप्टेंबर २०२६ रोजी वरील आठ ठिकाणी आयोजित करण्यांत आलेल्या पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याला सध्या स्थगिती देण्यांत आली आहे.

Scanned with OKEN Scanner

तरी, सदर रोजगार मेळाव्यामध्ये सहभागी होणार असलेल्या आपल्या व आपल्या अधिनस्त महाविद्यालयातील सर्व उमेदवारांना सदर रोजगार मेळावा स्थगित करण्यात आल्याची सूचना आपल्या व आपल्या अधिनस्त महाविद्यालयांच्या स्तरावरून देण्याची कार्यवाही करण्याची विनंती आहे.

तसेच सदर रोजगार मेळाव्याची पुढील नियोजित तारीख, वेळ व अन्य बाबींबाबतची माहिती आपणांस स्वतंत्रपणे लवकरच कळविण्यांत येईल.

करिता माहितीस्तव व कार्यवाहीस्तव सविनय सादर.

आपला,

(रा.ना.माटे)
सहायक आयुक्त,
जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता
मार्गदर्शन केंद्र, गडचिरोली.

<u>प्रतिलीपी माहितीस्तव व कार्यवाहीस्तव सविनय सादर :-</u>

मा.उपआयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, विभागीय आयुक्तालय, नागपूर.

Scanned with OKEN Scanner